|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University Jalgaon

'A' Grade
NAAC Re- Accredited
(4th Cycle)

## संलग्नता विभाग

जा.क्र.कबचौउमवि/०५/संलग्नता/महा.अभ्यासक्रम बंद/१३८/२०२६ दि. २१/०७/२०२६

**महत्वाचे**

**प्रति,**

**०१) मा.प्राचार्य,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये**

**०२) मा.संचालक,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था**

**०३) मा.संचालक,**
**खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता परिसंस्था**

**विषय :-** महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था,विद्याशाखा,अभ्यासक्रम, तुकडी इ. किंवा सॅटेलाईट केंद्र बंद करण्यासाठी सादर करावयाच्या प्रस्तावा बाबत..

**महोदय/महोदया,**

**महाराष्ट्र** सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२१ (१) मध्ये राज्य शासनाच्या पूर्व परवानगीखेरीज, एखाद्या संलग्न किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करण्याची अनुमती देण्यात येणार नाही. तसेच अधिनियमातील कलम १२१ (२) अन्वये महाविद्यालय किंवा मान्यताप्रप्त परिसंस्था बंद करु इच्छिणारे व्यवस्थापन आधीच्या वर्षाच्या ०१ ऑगष्ट रोजी किंवा तत्पूर्वी (महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था) बंद करण्यासंबंधीची सर्व कारणे नमूद करुन आणि इमारती व साधनसामग्री यांच्या रुपात असलेली मत्ता त्यांची मूळ किंमत, प्रचलित बाजारमूल्य आणि त्यास एकतर विद्यापीठ अनुदान आयोगाकडून/ राज्यशासनाकडून किंवा सार्वजनिक वित्तपुरवठा संस्थांकडून आतापर्यत मिळालेले अनुदान यांचा निर्देश करुन विद्यापीठाकडे अर्ज करील.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२१(८) मध्ये महाविद्यालय किंवा मान्ताप्राप्त परिसंस्था बंद करण्यासाठी पोट कलम (१) ते (७) मध्ये निर्देशलेली कार्यपध्दती, विद्याशाखा, अभ्यास पाठयक्रम, अभ्यासक्रम, तुकडी किंवा सॅटेलाईट केंद्र यांना बंद करण्यासाठीही योग्य त्या फेरफारसह लागू होईल. तसेच कलम ११२(१२)नुसार खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता परिसंस्था यांना सुध्दा ही बाब लागू राहील.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये वरीलप्रमाणे तरतूद केलेली असतांना देखील, संलग्नीत महाविद्यालये/परिसंस्थाकडून महाविद्यालये, परिसंस्था, विद्याशाखा, अभ्यासक्रम विषय इ. बंद करण्यासाठीचे प्रस्ताव निर्धारित वेळेत म्हणजे वर्षाच्या ०१ ऑगष्ट रोजी किंवा त्यापूर्वी सादर करीत नाहीत असे निदर्शनास आलेले आहे. त्या अनुषंगाने याव्दारे सर्व संलग्नीत महाविद्यालये/परिसंस्था यांचे मा.अध्यक्ष, मा.प्राचार्य, मा.संचालक यांना खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

०१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२१ (१), (२) व (८) मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार महाविद्यालय/परिसंस्था बंद करण्याबाबत तसेच विद्याशाखा, अभ्यासक्रम, पाठयक्रम, विषय किंवा सॅटेलाईट केंद्र बंद करण्याबाबत प्रस्ताव निर्धारीत वेळेत म्हणजे प्रत्येक वर्षाच्या ०१ ऑगष्ट रोजी किंवा त्यापूर्वी विद्यापीठाकडे सादर करावेत.

०२) प्रस्ताव सादर करतांना संस्थेचा ठराव जोडणे आवश्यक आहे. त्यात संस्थेचा ठराव क्र. व दिनांक, शैक्षणिक वर्ष, बंद करण्याचे कारणे नमूद करणे आवश्यक आहे. अभ्यासक्रम/महाविद्यालय/परिसंस्था बंद करण्यासाठी कलम ९७ नुसार महाविद्यालय विकास समितीचा ठराव सोबत जोडावा.

०३) महाविद्यालये/परिसंस्था बंद करणेसाठी प्रस्ताव सादर करतांना शासनाचे मंजूरीचे पत्र, विद्यापीठाचे संलग्नीकरणाचे नुतनीकरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.

**(कृ.मा.प.)**

०४) महाविद्यालये बंद करण्यापूर्वी संपूर्ण शुल्क भरणे आवश्यक राहील. संलग्नीकरण नुतनीकरण शुल्क भरलेले नसल्यास विद्यापीठ परिनियम १७२(ए) मध्ये नमूद केल्याप्रमाणे संलग्नीकरण शुल्क + दरमहा ५ % विलंब शुल्क (दंड) आकारुन प्रस्ताव स्विकारण्यात येईल.

०५) मा.विद्या परिषदेचा ठराव क्र. १३९/२०१७ दि.२२/०९/२०१७ व मा.व्यवस्थापन परिषद ठराव क्र. व्य.प.ए. २०८/२०१७, दि.०५/१२/२०१७ नुसार अभ्यासक्रम, विषय विद्याशाखा बंद करावयाचा असल्यास सदर अभ्यासक्रम सुरु करतांना जे संलग्नीकरण शुल्क भरलेले आहे त्याची ५० % शुल्क प्रस्तावा सोबत जमा करणे आवश्यक राहील.

०६) मागील तीन वर्षाची विद्यार्थी संख्या खालील तक्त्यात सादर करावी.

| अ.क्र. | शैक्षणिक वर्ष | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी संख्या | सुरुवातीची विद्यार्थी संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

०७) विद्यापीठाकडून प्रस्ताव स्विकारल्यानंतर महाविद्यालये, परिसंस्था, विद्याशाखा, अभ्यासक्रम बंद करणेबाबत पडताळणी समिती /स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात येईल. पडताळणी समितीच्या/स्थानिक चौकशी समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. पडताळणी समितीचे दैनिक भत्ता, प्रवास भत्ता, वाहतूक भत्ता इ. महाविद्यालये/परिसंस्था यांनी अदा करावयाचे आहे.

०८) संस्था किंवा महाविद्यालया बाबत न्यायालयीन प्रकरण असल्यास त्या संदर्भात प्रस्तावा सोबत न्यायालयीन आदेशासह प्रकरणाचे संपूर्ण दस्तऐवज सादर करणे आवश्यक राहील.

०९) महाविद्यालय/परिसंस्था बाबत तेथील कर्मचाऱ्यांच्या काही तक्रारी असल्यास सदर तक्रारींचे निराकरण संस्थेने/महाविद्यालयाने त्यांच्या स्तरावर निराकरण केल्यानंतरच प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करावा. अन्यथा याबाबतची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालय/परिसंस्थां यांची राहील.

१०) पडताळणी समिती/स्थानिक चौकशी समिती भेटीच्यावेळी शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी/विद्यार्थ्यांना समितीपुढे बोलविण्यात यावे. त्यांचे काही म्हणने असल्यास लेखी स्वरुपात म्हणने सादर करण्यात यावे.

११) पडताळणी समितीला/स्थानिक चौकशी समितीला अहवाल सादर करण्यास संपूर्णपणे सहकार्य करण्यात यावे. आवश्यक दस्तऐवज अहवाला सोबत एक प्रतीमध्ये सादर करण्यात यावे.

१२) महाविद्यालये/परिसंस्था/अभ्यासक्रम बंद झाल्यास शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी, मालमत्ता याबाबतचे संपूर्ण दायित्व संस्थेचे / महाविद्यालयाचे अध्यक्ष, प्राचार्य/संचालक यांची राहिल अशा आशयाचे रु. ५००/- च्या स्टॅम्पवर अध्यक्ष/सचिव यांच्या स्वाक्षरीचे नोटरी केलेले हमीपत्र प्रस्तावा सोबत सादर करणे आवश्यक राहील. **(सोबत हमीपत्राचा नमुना जोडलेला आहे.)**

१३) विद्यापीठ अनुदान आयोग, राज्यशासन किंवा इतर सार्वजनिक वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांकडून पुरविण्यात आलेल्या निधीचा वापर, वसूल करावयाच्या नुकसान भरपाईच्या किंवा भरपाई रक्कमेचे प्रमाण याबाबत संस्थेचे हमीपत्र प्रस्तावा सोबत सादर करणे आवश्यक आहे.

**(कृ.मा.प.)**

१४) महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये म्हणून महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/अभ्यासक्रम/विद्याशाखा/तुकडी बंदची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने करण्यात येईल. नव्याने प्रवेश दिला जाणार नाही याबाबत प्रस्तावात नमूद करणे आवश्यक आहे.

१५) जर विद्यार्थी प्रवेशित असतील किंवा बॅकलॉगचे विद्यार्थी असतील तर त्यांचे समायोजन कोणत्या महाविद्यालयात व कशाप्रकारे करणार आहात, बॅकलॉग विद्यार्थी परीक्षा कशाप्रकारे देणार आहेत, विद्यार्थ्यांचे टी.सी. व इतर पत्रव्यवहार करण्यासाठी कोणाची नेमणूक करणार आहात याबातचा संपूर्ण तपशिल देण्यात यावा.

१६) शासनाकडून बंदचे आदेश प्राप्त झाल्यानंतर महाविद्यालय/परिसंस्था/अभ्यासक्रम बंद समजण्यात येईल अन्यथा संलग्नता शुल्क भरणे आवश्यक राहील.

वरीलप्रमाणे कृपया नोंद घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करावी, ही विनंती. सदर पत्र मा.प्र-कुलगुरु महोदयांच्या परवानगीने निर्गमित करण्यात आले असून, विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तसेच संलग्नता विभागाच्या लॉगीनवर उपलब्ध आहे.

**आपला विश्वासू,**

**(डॉ. विनोद प्र.पाटील)**
**कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी :-**

०१) मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
०२) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
०३) कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
०४) मा.वित्त व लेखाधिकारी, कबचौउमवि, जळगाव

**रक्कम रु. ५००/- च्या स्टॅम्पवर नोटरी करावे)**

मी नामे ------------------------------------------------- वय------- रा.-------------------- हमीपत्र लिहून देत आहे की, मी ---------------------------------- या संस्थेचा/महाविद्यालयाचा अध्यक्ष असून आमच्या संस्थेमार्फत सुरु असलेले -------------------------------- हे अभ्यासक्रम/महाविद्यालय आम्हास शैक्षणिक वर्ष -------------------- पासून बंद करावयाचे आहे. याबाबत ठराव संस्थेने पारित केलेला असून त्याचा ठराव क्र. ------------- दि. -------------- असा आहे. (सोबत ठरावाची प्रत जोडलेली आहे.)

वरील अभ्यासक्रम / महाविद्यालयामध्ये यापूर्वी प्रवेशित असलेले विद्यार्थी त्यांचा अभ्यासक्रम जोपर्यत उत्तीर्ण होत नाहीत किंवा त्यांचे T.C. काढून घेवून जात नाहीत तोपर्यत सदर विद्यार्थ्यास परीक्षा अर्ज भरण्यास किंवा इतर कोणतेही दस्तऐवज उपलब्ध करुन देण्यास किंवा उपलब्ध साधन सामुग्रीचा वापर करण्यास आमची संस्था सर्व सहकार्य करेल, तसेच तो पर्यत आमच्या संस्थेचे कार्यालय सुरु राहील याची मी या नोटरी केलेल्या हमीपत्राव्दारे हमी देत आहे.

वरील अभ्यासक्रम/महाविद्यालयांसाठी शासनाकडून अद्यापपावेतो कोणतेही अनुदान प्राप्त झालेले नाहीत किंवा अनुदान मिळणेसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला नाही. महाविद्यालयासाठी आजपर्यतचा सर्व खर्च संस्थेने स्वत: केलेला आहे. त्यामुळे सदर अभ्यासक्रमासाठी उपलब्ध करुन दिलेल्या साधन सामुग्रीचा शासकीय अनुदानाशी संबंध येत नसून सदरची मालमत्ता ही संस्थेच्या मालकीची आहे व तीचा विनियोग संस्थेच्या नियमानुसार इतर शैक्षणिक कामकाजासाठी करण्यात येणार आहे याची मी हमी देत आहे.

तसेच सदर अभ्यासक्रम/महाविद्यालयासाठी नियुक्त केलेले शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सेवेत कोणत्याही प्रकारची बाधा न आणता त्यांना संस्थेच्या इतर अभ्यासक्रमांमध्ये किंवा शाखांमध्ये समाविष्ठ करुन घेण्यात येत आहे. याबाबत कोणताही वाद, तक्रार, न्यायलयीन दावा निर्माण झाल्यास त्यास मी संस्थेचा अध्यक्ष म्हणून सर्वस्वी जबाबदार राहील अशी मी या नोटरी केलेल्या हमीपत्राव्दारे हमी देत आहे.

संस्थेचे अध्यक्ष :----------------------------------